MHOS150016792021

## नियमीत दिवाणी दावा क. ७५४/२०२१

## निशाणी क. १२ वरील आदेश
**( वनिता वि. धोंडिबा )**

१. प्रस्तुतचा अर्ज नि. १२ हा वादी यांच्या वतीने दावा दुरूस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन थोडक्यात असे की, वादींनी विवाद्य दावा मिळकती संदर्भात वाटपाचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दावा दाखल करत असताना दाव्यातील परिच्छेद क. २ मध्ये मौजे हिंगणगाव (खु.) ता. परंडा येथील दावा मिळकत २/अ चे प्रत्यक्षात क्षेत्र ०० हे २३ आर आहे. परंतु टंकलेखन चुकीमुळे सदरचे क्षेत्र ०१ हे २३ आर असे नमुद झाले आहे. त्यामुळे सदर क्षेत्राबाबत दाव्यातील परिच्छेद २/अ मध्ये जमीन गट क. १३० क्षेत्र ०१ हे २३ आर ऐवजी ०० हे २३ आर असे क्षेत्र नमुद करण्यास परवानगी मिळावी. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरूपात बदल होत नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणात अद्याप मुद्दे निश्चित करण्यात आलेले नाहीत. वादी प्रस्तावित दुरूस्तीच्या माध्यमातुन टंकलेखनामध्ये झालेली चुक दुरूस्ती करू ईच्छीत आहे. प्रस्तावित दुरूस्ती झाल्यास दावाच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सबब वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायहिताच्या दृष्टीने योग्य आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

१. अर्ज नि. क. १२ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्जात नमुद केले प्रमाणे दाव्यात दुरूस्ती विहीत मुदतीत करावी.

सही/—

दिनांक १५/०९/२०२२

( आय. जी. महादेवकोळी )
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर परंडा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.N.Phurade |
| Name of Court | Shri. I.G.Mahadeokoli, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 15/09/2022 |
| Judgment signed by the P.O. on | 15/09/2022 |
| Judgment/Order uploaded on | 15/09/2022 |